# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक 2007/(322/07)विषि–4 महाराष्ट्र अधिनियम, 1994(1994 चा महा. 35) या कलम 3 च्या पोटकलम(2) अन्वये दिनांक 27 सप्टेंबर, 2011 रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

(विद्या विभाग )

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – 442605 फोन:07132 – 216554, 223104,223323

जा.क्र/गोविग/विद्या/६६१/२०१६ दिंनाक : १७/०१/२०१७

प्रति,

मा.प्राचार्य,
शिक्षण व शारीरिक शिक्षण महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषयः— शैक्षणिक वर्ष २०१६—१७ च्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्का करिताचा संकेतस्थळावरील शुल्क निर्धारण अर्ज भरणेबाबत.**

**संदर्भः—** मा.सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती यांचे पत्र क्र. शिशुस/शु.नि.अर्ज/२०१७/२४, दि. ०७/०१/२०१७ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६—१७ च्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क निर्धारणाकरिताचा ऑनलाईन अर्ज शिक्षण शुल्क समिती व उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले असून अर्ज भरण्यासाठी सोबत वेळापत्रक जोडलेले आहेत. तरी सर्व संबंधित महाविद्यालयांनी संदर्भीय पत्राचे अवलोकन करून वेळापत्राकाप्रमाणे विहीत मुदतीत अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.

धन्यवाद!

सहपत्रः— संदर्भपत्र व वेळापत्रक

(दिपक जुनघरे)
कुलसचिव (का.)
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
**शिक्षण शुल्क समिती,मुंबई**
( विनाअनुदानीत व कायमविनाअनुदानीत शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता–शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रिक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई–४०० ००१
E-mail :- sssbedmed@gmail.com / jd.hesss-mh@gov.in Tel -022 22694478 Web-www.sssmumbai.org

शिशुस/शु.नि.अर्ज./२०१७/२४ दि.०७.०१.२०१७

प्रति,

कुलसचिव,
राज्यातील अकृषी विद्यापीठे

विषय:— **शैक्षणिक वर्ष २०१६–१७ च्या प्रवेशीत विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्का करिताचा संकेतस्थळावरील शुल्क निर्धारण अर्ज भरणेकरिता अंतिम संधी.**

उपरोक्त विषयान्वये राज्यातील **विनाअनुदानित व कायम अनुदानित शिक्षण प्रशिक्षण व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासकमाचे** (बी.एड, बी.एड. इंटीग्रेटेड, एम.एड, बी.पी.एड., एम.पी.एड) **शैक्षणिक वर्ष २०१६–१७ च्या प्रवेशीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क निर्धारणाकरिताचा ऑनलाईन अर्ज शिक्षण शुल्क समिती व उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर** प्रसिध्द करण्यात येत आहे. संबंधित सर्व महाविद्यालयांना सदर अर्ज भरण्यासाठी सोबत जोडलेले वेळापत्रक पहावे. **अर्जातील माहिती अचूक व संपूर्ण भरणे बंधनकारक आहे** अन्यथा याबाबत **अपूर्ण किंवा चूकीची माहिती दिली या कारणास्तव होणाऱ्या कार्यवाहीस विद्यापीठ जबाबदार राहील**. तसेच महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि.०५.०७.२०१३ व दि.१९.०१.२०१६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे **नोंदणी शुल्क व नियमावलीत दर्शीविल्याप्रमाणे दंडात्मक रक्कम(रू.३०००/–) सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई (Joint Director, Shikshan Shulk Samiti, Mumbai)** यांचे नावे आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. व्दारे **बँक ऑफ इंडिया, काळबादेवी शाखा, मुंबई खाते कमांक–002420110001315** आय.एफ.एस.सी.कमांक **BKID0000024** येथे जमा करावे.

तरी उपरोक्त विद्यापिठाच्या **शिक्षण प्रशिक्षण व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासकमाचे** (बी.एड, बी.एड. इंटीग्रेटेड, एम.एड, बी.पी.एड., एम.पी.एड) केंद्रांनी आज्ञावलीतील **संपूर्ण अर्ज वेळापत्रकात नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत(१५.०१.२०१७ पर्यंत) भरणे आवश्यक आहे. तद्नंतर आज्ञावलीतून डाउनलोड करून प्रिंट काढून सोबत आवश्यक ती कागदपत्रे अर्जामध्ये नमुद केलेल्या पृष्ठकमांक टाकून व अनुक्रमाने जोडून व (पृष्ठ निर्देशक पट्टी जोडून ) या कार्यालयास दि.२२.०१.२०१७ पर्यंत** तीन प्रतित स्पायरल बाईडींग केलेले सादर करणे आवश्यक आहे.

अर्ज करण्यासाठी देण्यात आलेली मुदत अंतिम आहे. ज्या विद्यापीठांच्या केंद्रांकडून शै. वर्ष २०१६–१७ साठी शुल्क निश्चतीचे प्रस्ताव विहीत मुदतीत भरून सादर केले नाहीत तसेच **विहीत मुदतीनंतर प्रस्ताव सादर करणाऱ्या विद्यापीठांच्या केंद्रांकडून दंडात्मक विलंब शुल्क म्हणून अतिरिक्त रू.१०,०००/–शुल्क आकारण्यात येईल.** तसेच **जी विद्यापीठांची केंद्र शै.वर्ष २०१६–१७ साठी शुल्क निश्चतीचे प्रस्ताव पाठवून शुल्क निश्चित करून घेणार नाहीत, अशा अशा केंद्रांचे विद्यापीठाशी असलेले संलग्नीकरण पुढील वर्षापासून थांबविण्याकरिता विद्यापीठांना कळविण्यात येईल.**

सहसंचालक,
शिक्षण शुल्क समिती,मुंबई

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
**शिक्षण शुल्क समिती,मुंबई**
( विनाअनुदानीत व कायमविनाअनुदानीत शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता–शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई–४०० ००१
E-mail :- sssbedmed@gmail.com / jd.hesss-mh@gov.in Tel-022 22694478 Web-www.sssmumbai.org

**राज्यातील विनाअनुदानीत व कायमविनाअनुदानीत शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये व विद्यापीठाची केंद्र यांचे साठी शिक्षण शुल्क समितीचे २०१६–१७ या वर्षाचे शुल्क निश्चितीबाबतचे दंडात्मक रकमेसह प्राप्त होणा–या प्रस्तावांकरिताचे वेळापत्रक**

| अ. क्र. | तपशिल | कालावधी | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | आज्ञावली संकेतस्थळावर अपलोड करणे. | ०७.०१.२०१७ | |
| २ | आज्ञावलीतील अर्ज अचूक भरून सादर करणे | ०७.०१.२०१७ | १५.०१.२०१७ |
| ३ | आज्ञावलीतील भरलेले अर्ज ३ प्रतीत स्वाक्षरीनीशी व आधारीत आवश्यक कागदपत्रांसह सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई या कार्यालयास हार्ड कॉपी मध्ये सादर करणे. | ०७.०१.२०१७ | २२.०१.२०१७ |
| ४ | प्राप्त अर्जांची छाननी करून त्रुटी असल्यास ई–मेलव्दारे कळविण्यात येतील.(त्या तात्काळ पूर्ण करणे महाविद्यालयांना/केंद्रांना बंधनकारक राहील) | २२.०१.२०१७ | ३१.०१. २०१७ |
| ५ | छाननी झालेले अर्ज अभ्यासक्रमनिहाय शुल्क मान्यतेसाठी समितीसमोर ठेवणे. | ०१.०२.२०१७ | २०.०२.२०१७ |
| ६ | शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे व्दिवर्षीय अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०१५–१७ साठी मान्यताप्राप्त शिक्षण शुल्क संकेतस्थळावर जाहीर करणे. | २१.०२.२०१७ ते २८.०२.२०१७ | |

*(प्रस्ताव छाननीच्या अनुषंगाने )

सहसंचालक,
शिक्षण शुल्क समिती,
मुंबई